**सरकार वि. पंकज गोपाळ बोराडे**

निशाणी क्र. ३४/क

सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ ची जबानी
मी या व्दारे सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो कीः

| | |
|---|---|
| माझे नाव | - सुनिल अनंत शेवाळे, |
| वय | - ५१ वर्षे |
| व्यवसाय | - खाजगी नोकरी, |
| राहणार | - दहीवली, ता. खालापूर, जि. रायगड. |
| मुळ राहणार | - विनायक भवन, बिल्डींग नं. ३/बी., रुम क्र. ३५, प्रताप सिनेमा शेजारी, कोलबाड रोड, खोपट, ठाणे पश्चिम. |

**सरतपास सरकारी वकील श्रीमती पी. टी. बुये यांचे मार्फत शपथेवर सुरु....**

१) मी मॅक्स स्पेअर लि., दहीवली, पालीफाटा, खोपोली, ता. खालापूर यां कंपनी मध्ये जनरल मॅनेजर म्हणून १९९६ पासून नोकरी करतो. मी दहीवली, ता. खालापूर, जि. रायगड येथे कंपनीच्या गेस्ट हाउस मध्ये सन २००७ पासून माझ्या कुटूंबासह राहण्यास आहे. आमच्या कंपनी मध्ये विविध मशिनरी व साहीत्यांची निर्मिती केली जाते. आमच्या कंपनी मध्ये एकुण ८५० कामगार विविध विभागामध्ये काम करतात. त्यापैकी १२० कामगार हे कायमस्वरुपी असून उर्वरीत कामगार कंत्राटी पध्दतीने विविध कंत्राटदार यांच्या मार्फत कंपनीत काम करतात. आमच्या कंपनी मध्ये ८ तासांच्या एकुण ३ शिफ्ट मध्ये काम सुरु असते. मी आरोपीला ओळखत नाही. दि. २९/०६/२०२३ रोजी काय झाले होते मला आठवत नाही. त्यानंतर दि. २०/०७/२०२३ रोजी देखील काय झाले होते मला आठवत नाही. आमच्या कंपनीच्या गेटवर दोन अनोळखी व्यक्तिंनी येवून गोंधळ घालून तसेच सुरक्षा रक्षकांशी वाद घालून व्यवस्थापकांना भेटायचे आहे असे म्हणून त्या व्यक्ती कंपनीच्या सुरक्षा रक्षकांना दमदाटी करुन निघून गेल्या होत्या त्यामुळे मी अनोळखी व्यक्तिंविरोधात तक्रार देण्यासाठी पोलीस स्टेशनला गेलो होतो. त्यावेळी पोलीसांनी माझी तक्रार नोंद करुन घेतली होती. ती तक्रार मी वाचली नव्हती. आता मला दाखविण्यात आलेल्या जबाबावरील सही माझी आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही. सहीस **निशाणी ३५** देण्यात आली. माझ्या जबाबातील

अधोरेखांकित भाग 'अ' पोलीसांनी त्याप्रमाणे का लिहिला आहे याचे कारण मला सांगता येणार नाही.

**(साक्षीदार त्याच्या पोलीसांसमोरील जबाबाशी विसंगत साक्ष देत असल्यामुळे सरकारी वकील यांच्या विनंतीवरुन भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.)**

२) हे म्हणणे खरे नाही की, दि. २९/०६/२०२३ ते दि. ०१/०८/२०२३ या कालावधीमध्ये आरोपीने मी नोकरी करत असलेल्या मॅक्स स्पेअर लि. या कंपनी मध्ये कामगार कायद्यांचे उल्लंघन करुन कामगारांकडून १२ तासाच्या शिफ्ट मध्ये बेकायदेशीररित्या काम करुन घेतले जाते, त्या विरुध्द कामगार आयुक्त यांच्याकडे तक्रारी करण्याची ई-मेल द्वारे व प्रत्यक्ष भेटीमध्ये धमकी देवून तसेच कंपनी समोर आंदोलने व मोर्चा आणण्याची धमकी देवून तसे न करण्याकरीता माझ्याकडुन रु. १०,००,०००/- ची मागणी केली, त्यापैकी रु. २५,०००/- रोख रक्कम दि. २७/०७/२०२३ रोजी कंपनी मध्येच माझ्याकडुन स्वीकारली व आणखी पैशांची मागणी केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यासाठी मी आरोपी विरुध्द तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझी व आरोपीची न्यायालयाबाहेर तडजोड झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझी आरोपी विरुध्द काहीही तक्रार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमची तडजोड झालेली असल्याने आरोपीला वाचविण्यासाठी मी आज खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**आरोपीचे वकील श्री. एस. टी. वाडेकर यांनी उलटतपास नाकारला...**

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत.**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by DIPALI SUBHASH KHOT Date: 2026.06.06 18:13:45 +0530

( डा. एस. खोत )
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
कोर्ट क्र.२, खालापूर.

स्थळ - खालपूर.
दिनांक - ०६/०६/२०२६

**सरकार वि. पंकज गोपाळ बोराडे**

निशाणी क्र. ३६/क

सरकार तर्फे साक्षीदार क्र.२ ची जबानी
मी या व्दारे सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो कीः

माझे नाव - शशिकांत फुलचंद मोरे,
वय - ४१ वर्षे,
व्यवसाय - खाजगी नोकरी,
राहणार - खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड.

**<u>सरतपास सरकारी वकील श्रीमती पी. टी. बुये यांचे मार्फत शपथेवर सुरु....</u>**

१) मी फिर्यादीला ओळखतो. फिर्यादी मॅक्स स्पेअर लि., दहीवली, पालीफाटा, खोपोली, ता. खालापूर यां कंपनी मध्ये जनरल मॅनेजर म्हणून नोकरी करतात. मी देखील त्या कंपनी मध्ये अॅडमीन विभागामध्ये नोकरी करतो. आमच्या कंपनी मध्ये विविध मशिनरी व साहीत्यांची निर्मिती केली जाते. आमच्या कंपनी मध्ये एकुण ८५० कामगार विविध विभागामध्ये काम करतात. त्यापैकी १२० कामगार हे कायमस्वरुपी असून उर्वरीत कामगार कंत्राटी पध्दतीने विविध कंत्राटदार यांच्या मार्फत कंपनीत काम करतात. आमच्या कंपनी मध्ये ८ तासांच्या एकुण ३ शिफ्ट मध्ये काम सुरु असते. मी आरोपीला ओळखत नाही. दि. २९/०६/२०२३ रोजी काय झाले होते मला माहित नाही. त्या दिवशी मी कामावर हजर नव्हतो. पोलीसांनी माझ्याकडे चौकशी केली नव्हती. माझा जबाब नोंदवला नव्हता.

**सरतपास संपला.**

**<u>आरोपीचे वकील श्री. एस. टी. वाडेकर यांनी उलटतपास नाकारला...</u>**

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत.**

Digitally signed by DIPALI SUBHASH KHOT
Date: 2026.06.06 18:13:53 +0530

**( डी. एस. खोत )**
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
कोर्ट क्र.२, खालापूर.

स्थळ - खालापूर.
दिनांक - ०६/०६/२०२६